**ठळक बातम्या**

- राज्यात सर्वत्र लक्ष्मीपूजनाचा उत्साह, सामाजिक संस्थाकडून विविध उपक्रम
- मुहुर्ताच्या सौद्यावर शेअर बाजारात तेजी, जळगावमध्ये सोनं-चांदी स्वस्त
- यंदाच्या पावसाळ्यात अतिवृष्टी पुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आता ३ हेक्टरपर्यंतच्या बाधित क्षेत्रासाठी मदत मिळणार

**आणि**

- राज्यात अनेक ठिकाणी पावसाची हजेरी, येत्या काही दिवसात वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता

**<><><><><>**

दीपावलीचा सण सर्वत्र उत्साहाने साजरा होत आहे. आज घरोघरी तसंच व्यावसायिक आस्थापनांमध्ये लक्ष्मीपूजन होत आहे. त्याविषयी सविस्तर जाणून घेऊ आमच्या प्रतिनिधीकडून…

**व्हीसी**

*(दिवाळीच्या निमित्ताने बाजारपेठा, घरं आणि कार्यालयं आकर्षक रोषणाईने सजवण्यात आली आहेत. सर्वत्र आनंदाचं आणि मंगलमय वातावरण दिसत आहे. दिवाळीनिमित्त सर्वजण एकमेकांना शुभेच्छा आणि भेटी देत असून, घरोघरी विविध आकारांचे आकाशकंदील आणि मनमोहक रांगोळ्या सर्वांचं लक्ष वेधून घेत आहेत. दिवाळीनिमित्त शास्त्रीय संगीताच्या मैफिलींचं आयोजन ठिकठिकाणी करण्यात आलं आहे. राज्य सांस्कृतिक संचालनालयातर्फे मुंबईत विविध ठिकाणी सांस्कृतिक कार्यक्रम होत आहेत.*

*आज अश्विन अमावस्या म्हणजे लक्ष्मीपूजनाचा दिवस. व्यापारी वर्गासाठी हा दिवस अत्यंत महत्त्वाचा मानला जातो. गेल्या वर्षभराची खतावणी बंद करुन नवीन चोपडी सुरु केली जाते. घरोघरी चलनी नोटा-नाण्यांसह, देवी लक्ष्मीच्या प्रतिमेचं आणि नवीन झाडूचं पूजन झालं. लक्ष्मीपूजनानिमित्त आज शिर्डीच्या साईबाबा संस्थानात साईबाबांच्या समाधी मंदिरात लक्ष्मी-कुबेर पूजन करण्यात आलं.*

*उद्या दीपावली पाडव्याला सोनं-चांदी खरेदीसाठी उत्साहाचं वातावरण असतं. जळगावच्या बाजारपेठेत आज चांदीच्या दरात १ हजार रुपयांची घसरण होऊन ती १ लाख ७० हजार रुपये*

*प्रतिकिलो झाली. तर सोन्याच्या दरातही १०० रुपयांची किरकोळ घसरण होऊन ते तोळ्यामागे १ लाख २८ हजार रुपये दरानं मिळत होतं.*

*लक्ष्मीपूजनाच्या निमित्तानं शेअर बाजारात आज मुहूर्ताच्या सौद्यांचं सत्र झालं. सत्र संपलं तेव्हा सेन्सेक्स ६३ अंकांची वाढ नोंदवत ८४ हजार ४२६ अंकांवर बंद झाला. निफ्टी २५ अंकांची वाढ नोंदवत २५ हजार ८६९ अंकांवर बंद झाला.*

*एकिकडे उत्साह असताना दुसरीकडे वाशिम जिल्ह्यात मात्र झेंडुची आवक वाढल्याने दर घसरल्याने झेंडु उत्पादक शेतकरी चिंतेत आहेत. )*

**<><><><><>**

छत्रपती संभाजीनगरमधल्या वैजापूर तालुक्यातल्या अतिवृष्टीग्रस्त कुटुंबीयांसोबत माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी दिवाळी साजरी केली. यावेळी अतिवृष्टीग्रस्त कुटुंबीयांना किराणा सामान, सतरंजी, चादर भेट म्हणून दिल्या.  खासदार डॉ. कल्याण काळे यांनी भगवान बाबा बालिकाश्रम येथे अनाथ मुलांसोबत दिवाळी साजरी केली.

**बुलढाणामध्ये** जळगाव जामोद, संग्रामपूर,शेगाव, सह विविध भागातल्या अनाथ मुलांबरोबर दिवाळी साजरी केली. स्व.श्रीरामजी कुटे गुरुजी सामाजिक संस्थेच्या वतीनं हा  उपक्रम राबवला.

**अहिल्यानगर** रेल्वे स्थानकावरच्या बेवारस नागरिकांसाठी तुकाराम कातोरे मित्र मंडळानं विविध उपक्रम राबवले. गेल्या १८ वर्षांपासून सुरू असलेल्या या उपक्रमाचा लाभ यंदा १०० वंचितांना झाला.

**<><><><><>**

दिवाळीच्या मुहूर्तावर देवगडच्या हापूस आंब्याची पहिली पेटी मुंबईत दाखल झाली आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात देवगड इथल्या पडवणे गावचे आंबा बागायतदार प्रकाश शिरसेकर यांच्या बागेतले हे आंबे आहेत. नवी मुंबईतल्या एपीएमसीमधे हे आंबे विक्रीसाठी उपलब्ध झाले असून त्याला विक्रमी भाव मिळण्याची शक्यता आहे.

<><><><><>

राज्यातल्या अनेक जिल्ह्यांमध्ये सप्टेंबर आणि ऑक्टोबर महिन्यात अतिवृष्टी आणि महापुरामुळे झालेल्या नुकसानीचे पंचनामे पावसामुळेच वेळेत होऊ शकल्यानं बिनचूक आकडेवारी शासनाला वेळेत मिळू शकली नाही, त्यामुळं दिवाळीपूर्वी नुकसानभरपाई द्यायला उशीर होत आहे, अशी खंत कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी आज व्यक्त केली. त्याच वेळी, शेतकऱ्यांनी काळजी करू नये, त्यांना मदत करण्यासाठी शासन वचनबद्ध आहे, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. सोलापूर जिल्ह्याच्या दौऱ्यादरम्यान ते वार्ताहर परिषदेत बोलत होते. एनडीआरएफच्या निकष आणि अटींमध्ये दोन हेक्टरपर्यंतची मर्यादा होती, मात्र नुकसान मोठं असल्यानं ती मर्यादा तीन हेक्टरपर्यंत करण्यात आली आहे. सुरुवातीचे पंचनामे दोन हेक्टरपर्यंत झाले होते, आता ते तीन हेक्टरचे होणार आहेत. त्यासाठी नुकसानभरपाईचं वाटप करायला थोडा उशीर होत आहे, अशी कबुली त्यांनी दिली. विमा कंपन्यांनी पीक कापणी प्रयोगाची अट न घालता शेतकऱ्यांना विम्याची रक्कम अदा करावी, अशा सूचना दिल्याची माहितीही त्यांनी दिली.

<><><><><>

यंदाच्या पावसाळ्यात अतिवृष्टी पुरामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना आता ३ हेक्टरपर्यंतच्या बाधित क्षेत्रासाठी मदत मिळणार आहे. याकरता विशेष बाब म्हणून ६४८ कोटी १५ लाख ४१ हजार रुपयांच्या निधीच्या वितरणाला मान्यता देण्यात आली असल्याची माहिती मदत आणि पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील यांनी दिली. या बाबतचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे.

यंदाच्या खरीप हंगामात शेतकऱ्यांना सुमारे ८ हजार १३९ कोटी रुपये इतक्या रकमेचं अर्थसहाय्य वितरित करण्याचे शासन निर्णय जारी झाले आहेत.

<><><><><>

नवी मुंबईत आज आगीच्या दोन वेगवेगळ्या घटनांमध्ये एकूण ७ जणांचा मृत्यू झाला. वाशी विभागात एका निवासी संकुलात पहाटे आग लागून ५ जणांचा मृत्यू झाला, तर १०पेक्षा जास्त जण जखमी झाले. मृतांमध्ये ६ वर्षांच्या मुलीचा समावेश आहे. दुसऱ्या एका घटनेत कामोठे इथं सिलेंडरचा स्फोट होऊन लागलेल्या आगीत दोघींचा मृत्यू झाला.

**<><><><><>**

धाराशिव जिल्ह्यात दोन गाड्या एकमेकांवर आदळून झालेल्या अपघातात चार जणांचा मृत्यू झाला तर दोघे जखमी आहेत. सोलापूरमधील सिव्हिल रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु आहेत.

**<><><><><>**

एकाकी जीवन जगत असलेल्या ज्येष्ठ नागरिकांसाठी सिंधुदुर्ग पोलिसांनी संवादातून आधार हे Whatsapp Channel सुरू केलंय. ७०३६ ६०६०६० या हेल्पलाइन क्रमांकाद्वारे या चॅनेलद्वारे ज्येष्ठ नागरिकांशी पोलिस जोडले जातात. दिवाळीनिमित्त या ज्येष्ठ नागरिकांचे मेळावे पोलिसांनी आयोजित केले होते. याविषयी जाणून घेऊया आमच्या वार्ताहरांकडून

**व्हाइस कास्ट**

*(दिवाळीनिमित्त जिल्ह्यात २२ ठिकाणी या ज्येष्ठ नागरिकांचे मेळावे घेऊन त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या. त्यामध्ये ८०१ ज्येष्ठ नागरिक सहभागी झाले होते. जे ज्येष्ठ नागरिक या मेळाव्यांना उपस्थित राहू शकले नाहीत अशा सुमारे १५० जेष्ठ नागरिकांच्या घरी जाऊन पोलीस यंत्रणे कडून शुभेच्छा देण्यात आल्या. जेष्ठ नागरिकांसाठी आयोजित मेळाव्यात ज्येष्ठ नागरिक कायदा, सायबर क्राईम, संवादातून आधार, समुद्र संदेश याबाबत माहिती त्यांना देण्यात आली. तसंच मालवण आणि वेंगुर्ले पोलीस ठाण्यात जेष्ठ नागरिकांसाठी आरोग्य तपासणी शिबिर*

*मनोरंजनाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले. सिंधुदुर्ग पोलिसांच्या या संवेदनशील कृतीमुळे ज्येष्ठ नागरिकांची दिवाळी मात्र अधिक आनंददायी झाली आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी सिंधुदुर्गहून निलेश जोशी)*

**<><><><>**

चाळीसगाव विधानसभेचे माजी आमदार राजीव देशमुख यांचे हृदयविकाराच्या झटक्याने आज निधन झालं. २००९ ते २०१४ या काळात चाळीसगाव विधानसभेचे आमदार होते. त्याआधी
चाळीसगाव नगरपरिषदेचे नगराध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम केलं होतं.

**<><><><>**

सोलापूर दक्षिणचे माजी आमदार दिलीप माने यांच्या भाजप प्रवेशाविरोधात भाजपाच्या कार्यकर्त्यांनी आज पक्ष कार्यालयासमोर काळ्या टोप्या घालून आंदोलन केलं. पक्ष वाढला पाहिजे, मात्र पक्षाने प्रवेश देताना त्या नेत्यावरचे आरोप तपासले पाहिजेत, अशी मागणी कार्यकर्त्यांनी केली.

**<><><><>**

मुंबईत आज हवेचा गुणवत्ता निर्देशांक २१० म्हणजे खराब पातळीवर नोंदवला गेला, तर पुण्यात हा निर्देशांक १३०वर, म्हणजेच सामान्य पातळीवर आहे.

**<><><><>**

राज्याच्या अनेक भागात आज पाऊस झाला.

**जालना** जिल्ह्यातल्या बहुतांश भागात जोरदार पावसामुळे दिवाळीची खरेदी करणाऱ्यांच्या उत्साहावर पाणी पडलं. **अहिल्यानगरमध्ये** दुपारी झालेल्या पावसानं अनेक भागात पाणी साचलं. **रत्नागिरीत** सध्या भातकापणीला वेग आला आहे. पण आज पाऊस झाल्यानं शेतकरी चिंतेत आहेत. **ठाण्यातही** संध्याकाळी अनेक

ठिकाणी पाऊस पडला. **बीडमध्ये** माजलगाव धरण पाणलोट क्षेत्रात पडत असलेल्या पावसामुळे धरणाची पाणी पातळी नियंत्रित करण्यासाठी सिंधफणा नदीत विसर्ग करण्यात आला आहे. तरी नदीकाठच्या गावातल्या नागरीकांनी खबरदारी घ्यावी असं प्रशासनानं कळवलं आहे.

**-<><><><><>**

देशभरातून नैऋत्य मोसमी पावसाने माघार घेतली असली, तरी बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे राज्याला पुन्हा अवकाळी पावसाचा तडाखा बसेल अशी शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. उद्यापासून चार दिवस राज्यभरात वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता आहे.

येत्या चोवीस तासात कोकणात काही ठिकाणी तर मध्यमहाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पाऊस पडेल असा अंदाज हवामान खात्यानं वर्तवला आहे.

**//<><><><><>//**